मोठी गीता 9404234308 | छाया 9923021789
लहानमुले विद्या 7588275730 | नीलाताई 9028411860

EXPO

12

परीक्षा पेपर
Examination Paper

SCHOOL शाळा वीरकर
8275148049

NAME नाव Anjali Shinde

STD इयत्ता ______ DIV तुकडी ______

SUB विषय ______ NO. नं ______

| DATE | |
|---|---|
| Quest. | |
| 1 | |
| 2 | |
| 3 | |
| 4 | |
| 5 | |
| 6 | |
| 7 | |
| 8 | |
| 9 | |
| 10 | |
| Total | |

© www.madhaveeraghuveer.com

॥श्री॥ १५ जुलै २०१८

सम्भवामि युगे युगे।

काले भवतु पर्जन्य: पृथिवी सस्यशालिनी।
देशोऽयं क्षोभरहित: सज्जना: सन्तु निर्भया:।

ही विश्वप्रार्थना आहे. कोणताही देश, धर्म, पंथ जात संप्रदाय यांच्यासाठी नव्हे तर अखिल विश्वात शांतता नांदावी, समृद्धी यावी यासाठी त्या विश्वंभराकडे केलेली ही व्यापक प्रार्थना आहे. यातील पहिले दोन चरण निसर्गनिर्मित संकटे येऊ नयेत. पाऊस वेळेवर पडावा. धनधान्यांनी पृथ्वी वैभवशाली असावी असे म्हटले आहे. मात्र पुढील दोन चरणात मानवनिर्मित संकटांचे निवारण व्हावे यासाठी मागणे मागितले आहे. समाजातील असंतोषातून मोर्चे, संप, हरताळ, चळवळी अशा गोष्टींना खतपाणी मिळते आणि क्षोभाचा उद्रेक होतो अशा कठिण प्रसंगी माणूस धास्तावतो अस्वस्थ होतो. सामान्या त्यात सज्जनांना तर अशा

विपरीत गोष्टींची भीती वाटते. सज्जनांना कोणी वाली नसतो. केवळ आर्थिक सुबत्ता किंवा प्रगाढ ज्ञान त्यांना निर्भय करू शकत नाही. आकाशातून अंधाराचे मेघ दाटून आले असताना सुखी, आनंदी, निर्भय कसे राहता येणार? अशा समाजात भ्रष्टाचार हा शिष्टाचार होऊन बसतो. दुष्ट शक्ती दुर्बलांवर आघात करतात. दुर्जनांच्या हाती सत्ता जाते. न्यायसंस्था दुबळी होते. अशा वेळी तक्रार कोणाकडे करणार? गाऱ्हाणे कोणापुढे मांडणार? सामाजिक मूल्ये जेव्हा पायदळी तुडवली जातात तेव्हा जगण्याला काही अर्थ उरत नाही. नीतिमत्ता ओळखायला सुद्धा शिल्लक राहत नाही. कुंपणच शेत खायला लागते. खरे तर सज्जनांच्या सज्जनपणावर समाजाची धारणा होत असते. असे सज्जनच जर जीव मुठीत धरून जगत असतील तर या समाजाला कोण वाचवणार? --- श्लोक.

अशा वेळी कोणाची प्रार्थना करायची? अशा वेळी दैवी शक्तीच दिलासा देतात. सत्याचाच जय नेहमी होतो याची प्रचीती येते.

परित्राणाय साधूनां-----

जेव्हा जेव्हा अशा अनिष्ट गोष्टींचा उद्रेक होतो तेव्हा तेव्हा प्रत्येक युगात भगवंत अवतरतात. यात त्यांच्या अवताराचे तीन प्रमुख उद्देश सांगितले आहेत. सज्जन जेव्हा गांजले जातात नाडले जातात. सत्याचा आवाज दडपून टाकला जातो तेव्हा त्यांचे सर्व बाजूंनी रक्षण करण्यासाठी भगवंत अवतार घेतात. परंतु सज्जनांचे रक्षण एकदा दोनदा करून भागणार नाही. कारण समाजातील दुष्प्रवृत्ती वारंवार उफाळून येतात. डोके वर काढतात. त्यांना

तात्पुरता बंदोबस्त करून भागणार नाही. तर त्यांना ठेचून टाकायला हवे. कारण थोडी जरी दुष्ट वृत्ति शिल्लक राहिली तरी ती सूडाच्या भावनेने पेटून उठते व आपल्याला घातक ठरते. म्हणून शेष न ठेवता त्यांचा पुरता बंदोबस्त करायला हवा. धर्मसंस्थापनार्थाय - धर्माची पुन्हा प्रतिष्ठापना करायला हवी.

---

कुरुक्षेत्रावरील युद्ध हा अर्धविराम होता. संहारानंतर पुनर्निर्मितीचे कार्य | सुनियंत्रित राज्ययंत्रणा | सांस्कृतिक मूल्यांचा जीर्णोद्धार, धर्माची पुनर्स्थापना अवतारांचे प्रयोजन | माणूस मायामोहाच्या, पसाऱ्यात गुरफटला की त्याचा धर्माला पारखा होतो धर्माचे बंधन सुटले की अधार्मिक कृत्ये घडतात. स्वार्थ जागा झाला की तो परमार्थाकडे पाठ फिरवतो, अधर्म बोकाळतो. माणुसकी पायदळी दोन पायांचा पशु! ज्येष्ठांविषयी आदरभाव नष्ट! सर्वत्र स्वैराचार | चाकर पूर्वी जसे मुनी — सर्वत्र संचार — भूमी, पाणी, सूर्यप्रकाश सर्वांचे समाजप्रबोधन | समाजव्यवस्थेवर धर्माची बंधने जसे Legislation राजा Execution.

समाजाचे धारण पोषण करते तो धर्म!

कोणी दैहिक तेवढ्याचाच स्वीकार | दान, अध्ययन, तप, अहिंसा, सत्यभाषण, यज्ञ ही धर्माची लक्षणे विसर सुटलेल्या धर्माला आवरण्याची शक्ती, धर्मजिवक असते. दुष्टांची दुष्टावर मात होते तेव्हा, दुष्टांचे अधार्मिक राज्य नष्ट करून धर्मराज्य प्रस्थापित करणे कालक्रमणा. भगवंत आकाशात राहून हे कार्य करत नाही. साधुसंतांना भेटण्यासाठी अवतार घेतात

Great Man think alike कारण तिथे मानवी मनाच्या एकीकरणातून वैश्विक मनाशी संपर्क साधला जातो. अशी वैश्विक मनबुद्धी मनुष्य अवतार घेण्यासाठी ज्या तत्वाला प्रयुक्त करते अधर्म प्रबळ झाल्यानंतर ईश्वर अवतार घेता व सर्व संकटांचे निवारण करतो अशी जर भावना दृढ झाली तर मानवाचे काहीच कर्तव्य उरणार नाही. त्यातून नाकर्तेपणा व परावलंबित्व निर्माण होईल. परंतु हे लक्षात घ्यायला हवे की परमेश्वराने धाव घेण्यासाठी आपण साधु असायला हवे. साधु म्हणजे सात्विक, उत्तम, उत्तमत्वाने अंगी बाणवलेले. अशा तऱ्हेने जेव्हा अनेक साधु पुरुष एकत्रितपणे प्रयत्न करतील तेव्हा त्यांच्या मनाचा संपर्क वैश्विक मनाशी जोडला जाईल. व जगाच्या उद्धारासाठी जगद्गुरू तत्व अवतार घेतील. व मानवाला सर्व संकटातून पार नेतील.

परमात्म्याचे परमचैतन्य जेव्हा चेतनारूपात येते तेव्हा त्याला परब्रह्म (शक्ति) म्हणतात. हे अवतारूपात सर्व ब्रह्मांडासाठी कार्यरत असतेच. परमतत्वाचा एक अंश या विश्वाचे नियंत्रण करतो ते ब्रह्म. जेव्हा या चेतनातून नव धर्मरक्षणासाठी ते तत्व अवतारूपात अवतरते तेव्हा ते जगद्गुरुतत्व म्हणून ओळखले जाते. आणि आपणच निर्माण केलेल्या जगाची घडी परत व्यवस्थित व्हावी म्हणून ज्या तेजस्वी आणि ओजस्वी पराक्रमी पुरुषांच्या रूपात हे तत्व जन्म घेते त्याला अवतार म्हणतात.

महास्फोटातून निर्माण झालेल्या शक्तीच्या मदतीने विश्वाचा पसारा चालवणाऱ्या क्रियाशक्ति निसर्गनियमांना प्रकृति असे म्हणतात तर या नियमांवर नियमन ठेवणाऱ्या वैश्विक मनबुद्धीला पुरुष असे म्हणतात.

© www.madhaveeraghuveer.com

डॉ. बेकी I stitch God heals.
हृदयाच्या रोगांचे वैयक्तिक शल्यविशारद.

शुद्ध मनाने सुरु केलेल्या सात्त्विक प्रयत्नात जेव्हा अडचण निर्माण होते तेव्हा निद्रेमध्ये त्यासंबंधीचे विचार अंतराळात फेकले जातात व ते वैश्विक बुद्धीतून परावर्तित होतात असे परावर्तित विचार जास्त शक्तिमान होतात —— डॉ. अब्दुल कलाम (अग्निपंख)
यालाच आपण देव मदतीला धावला म्हणतो

द.ना.मराठे
धर्ममार्गाने चालणाऱ्या माणसावर संकटे येऊ लागली की त्याची श्रद्धा डळमळीत होते. अधर्माने वागणारे सुखात आहेत असे चित्र असताना धर्माने वागून काय उपयोग? असे वाटते तेव्हा धर्माची फार मोठी हानी होते.

पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा, वेश्येला मणिहार। अशा धर्माने वागण्यासाठी आत्मबळ आवश्यक आहे. दुर्जन सज्जनांना सुखाने जगू देत नाहीत त्या वेळी अधर्म, अनाचार, वाईट विचारांची वाढ होते नाही त्या पद्धती धर्मामध्ये घुसतात, नको त्या प्रथा स्वीकारल्या जातात.

धर्माने वागणे हाच खरा पुरुषार्थ आहे. अंतिम विजय सत्याचाच होतो हे पटवून देण्यासाठी भगवंतांना सगुण साकार रूप धारण करावे लागते

युगे युगे याचा अर्थ प्रत्येक काळात, प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक परिस्थितीत।

मी अविवेकाची काजळी। फेडून विवेकदीप उजळी
ते योगिया पाहे दिवाळी। निरंतर।।

अन्यायी लोकांचे, दुष्टांचे निर्दालन केल्यामुळे लोकांच्या मनावरचे ओझे दडपण दूर होते. विवेक जागृत होतो. योग्य-अयोग्य कळते. सज्जन लोकांसाठी तर ही निरंतर दिवाळीच असते.

© www.madhaveeraghuveer.com

श्री०माधवानंद

हे श्लोक ऐकल्यावर मनात आशेचा किरण चमकून जातो. भगवान अवतीर्ण होऊन या समाजातील अनवस्था दूर करतील

यदा यदा, युगे युगे — त्रिकाली सूचक और

धर्म म्हणजे स्वभाव, अंगभूत गुण

धर्म ,, अस्तित्वाचा नियम धारण करणारा

देवाच्या प्राप्तिसाठी उपासना व योग्य आचरण मिळून धर्म होतो. पूर्वी ज्ञानी विचारवंतांनी वागणुकीचे नियम व उपासनेच्या पद्धति घालून दिल्या. विविध प्रथा, परंपरा, नीतिनियम यातून सत्वशक्तीचा विकास, देवभावना गळाली - शैथिल्य येते तेव्हा वाईट प्रवृत्ति जोर धरतात. सात्विकांचा समाज संघटित नसतो वाईट व्यक्ती चटकन एकत्र येतात. वाईटाचा आवाज वाढला की धर्माचा आवाज दडपला जातो.

वर्तमानपत्र - पहिले पान - जाहिरात.

धर्मसंस्थापनेचे नर / हे ईश्वराचे अवतार सर्व आहेत जुडे होणार।

अधर्माचे प्राबल्य (अभ्युत्थान) धर्माला ग्लानि आली की अधर्म जोर धरतो.

सत्वशक्तीचा वैयक्तिक व सामाजिक पातळीवर विकास हा धर्माचा उद्देश आहे.

समाजात अनिष्ट गोष्टींचा, सत्व-विघातक प्रवृत्तींचा अतिरेक झाला की अधर्म्य कृत्य करणाऱ्याचा उत्साह वाढतो. दुष्प्रवृत्त लोक सज्जनांना चांगले वागण्याबद्दल शिक्षा करू लागतात. क्लेश देतात. समाजाला दिशा मिळत नाही अशा वेळी मी स्वतः प्रगट करतो.

कशा रीतीने ? स्वतःच्या योग प्रकृतीने प्रगट करतो

का ? कशासाठी ? तीन प्रमुख कार्ये

मागील श्लोकात धर्माला ग्लानी → अधर्माचे प्राबल्य

तसेच ४थे परित्राणाय साधूनां → विनाशाय च दुष्कृताम्

साधु म्हणजे ईश्वरनिष्ठ → साधक, सिद्ध

सिद्ध पुरुष – समाजप्रबोधन – आपल्यात प्रेमाने संस्कार – कुठे हे ज्ञान देखवेना --- माणसांची आंतरिक उन्नती, सद्गुणांच्या सत्वशक्तीचा विकास होण्यासाठी सहाय्यभूत होतात. त्यांच्या सात्विकतेच्या प्रकाशात इतरांची जीवने उजळून निघतात. असे हे संत असतात. त्यांची पातळी उंच व प्रेरणादायी !

मुमुक्षु साधक व सिद्ध हे सर्व ईश्वराचेच सत्वसंवर्धनाचे काम करत असतात. सत्व creamy layer. साधूंच्या ईश्वरावरील प्रेमाला प्रतिसाद देण्यासाठी, त्यांच्या प्रेमाचे ऋण फेडण्यासाठी तो अवतार घेतो. परित्राणाय साधूनाम् – विनाशाय च दुष्कृताम् मध्ये नाइलाज आहे. ते अपरिहार्य कर्म आहे. दोन्ही हातात हात घालूनच येतात. प्रल्हाद – हिरण्यकशिपु एकाच घरात.

अवतार व संत यात फरक आहे. विनोबा –

रक्षावया जगी संता दुष्टा दूर करावया --

दैत्यांची कुळे नाशी । साधूंचा मानु मिरवी

धर्मासी नीतीशी । शोभा भरी ॥

रावणाला मारायलाच हवे होते, समजावून सांगणे शक्य नव्हते. भ. श्रीकृष्णाने मुख्य धर्मयुद्धापूर्वीच शिशुपाल, जरासंध, नरकासुर, यांचा वध केला.

कालयवन — मुचकुंद.

© www.madhaveeraghuveer.com

सज्जनशक्तीचे संरक्षण व संवर्धन - धर्माचा उद्देश
चांगल्याचा सन्मान घडवायचा असेल तर दुष्टांना मारणे अपरिहार्य आहे. हा धर्माचा भाग आहे. ① समाजाला लागलेली कीड पूर्णपणे काढून टाकली तरच सज्जनशक्ती जोमाने फोफावेल.

आचारभ्रष्टतेला मान्यता मिळाली तर धर्माची घडी विस्कटून जाते. इथे नवीन धर्म स्थापायचा नव्हता तर इतर अनिष्ट गोष्टी कर्मकांड कमी करून त्यातील मूल्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणे ही धर्मसंस्थापना आहे.

उपनिषदांमध्ये शुद्ध ज्ञान - आत्मज्ञान सांगितले आहे परंतु वेदातील सकाम उपासनेला धर्म समजून त्यातील कर्मकांड, यज्ञयाग, स्वर्गप्राप्ती यांची भलावण करणारा वर्ग समाजात अस्तित्वात होता. सर्वसामान्य भाविक लोक यालाच धर्मकृत्य समजत होते आणि खऱ्या धर्ममार्गापासून दूर चालले होते. सूक्ष्म चिंतनाने ईश्वराची अनुभूती घेणे हे यज्ञयाग, तप, दानधर्म यापेक्षा कठीण काम आहे त्यापेक्षा सामान्यांना कर्मकांड सोपे, त्यामध्येच समाज रमत होता. खरे पाहिले तर योग्य धारणेने व भावनेने केलेले प्रत्येक कर्म हे यज्ञकर्मच आहे. कोणतेही कर्म - मग ते - समाजाच्या दृष्टीने कितीही तुच्छ असो - जर ईश्वरार्पण बुद्धीने केले तर ते यज्ञकर्मच ठरते. सत्कर्मकुसुमांची माळ ईश्वराला सर्वाधिक प्रिय असते.

परमार्थ हा प्रपंचापासून वेगळा नाही. परमार्थ हा जीवनस्पर्शी व्हायला हवा. सर्व जीवनकर्मांमध्ये धर्माचे अधिष्ठान असावे ही दृष्टी भागवत देतात.

ऐसे या काळाकाळी | अवतरे मी युगीयुगी |
परि ~~हे~~ हेचि वोळखे जो जगी | तो विवेकिया

विनोबा —— भक्ताचे आरोहण झाले की ॥५८

भगवंताचे अवतरण होते. हा प्रयत्न व पुरुषार्थ यांची सांगड आहे. भक्ताने साधना, उपासना करावी. अंतःकरणाची उन्नत पातळी गाठावी तसतसा भगवंत प्रति साद देतो खाली उतरतो. आईला जसे मुलाला कडेवर घेण्यासाठी वाकावे लागते तसे ईश्वराचे अवतरण आहे

Ascending efforts of man and Descending Grace of God.

अवतार म्हणजे खाली उतरणे - परमात्मा म्हणजे विश्वव्यापक शक्ती आकारात येते, देह घेते म्हणजे अवतरण। त्याचा विशिष्ट उद्देश घेऊन विश्वशक्ती अवतरते. धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा
Law is the foundation of the Universe
~~सारे विश्व या नियमांनी चालते या नियमांनाच~~
'धर्म' म्हणतात. हे धर्म कोणी पूर्ण उद्ध्वस्त करू शकत नाही. पण धर्माला ग्लानि येऊ शकते. मनुने या विश्वधर्माचा अभ्यास करून समाज रचना केली म्हणून मनुष्याच्या सांघिक समाजरचनेला धर्म असे म्हणतात. धर्मो धारयते प्रजाः ।

समाजरचना फुटून निघणे, विस्कळित होणे म्हणजे अधर्म मानणे. अशा वेळी समानुकूल

© www.madhaveeraghuveer.com

मोडकळून जातो तेव्हा नव्या परिस्थितीत समाज बांधणीचे, धर्मसंस्थापनेचे काम हाती घ्यावे लागते. ते काम तत्त्वज्ञान करते. जगातल्या त्या त्या मानवी समाजाला हळूहळू विकासाच्या पायरीवर नेणारे असे हे अपूर्व तत्त्वज्ञान आहे.

© www.madhaveeraghuveer.com

संकल्पना – प्रभुत्व – कामिता (६ संकल्प)

विषयांच्या मर्यादा

अनित्यत्व, दुःखित्व, अक्षरत्व, मिथ्यत्व

अनुत्साह, नैराश्य, वैताग

क्रोध – वैयक्तिक हानी, खेद, पश्चात्ताप

सामाजिक घात, उन्माद निर्माण करतो

क्रोधामुळे अहंकार पोसला जातो.

क्रोधाच्या जागी संयम, सम्यक करणे आवश्यक. मारक

होऊ देऊ नये. विवेकबुद्धी जागृत

ओठातून रागवावे, पोटातून नाही आईच्या मायेने रागवावे

काम – मूळस्वरूपात शुद्ध, उपयुक्त कामनांना अनुकूल होणे

शरीर मन बुद्धीच्या विकासासाठी आवश्यक

नाना विकार – लैंगिक, अहंकार

भांडणे, अपहरणे, अत्याचार, बलात्कार, कलह, सन्ताप

या विकृतींमुळे समाजात अराजक माजते.

मद – लोभ, गर्व, दर्प, उन्मत्त, उद्दाम स्वभाव

अहंकाराचे विकृत स्वरूप. मी जास्त दिसतो

त्यापेक्षा मोठा आहे.

धन, गुण, सत्ता, श्रीमंती, तारुण्य

मदामुळे नाश होतात. सद्गुरूंकडे पाठ फिरवली

जाते. आदर्श उरत नाही.

मत्सर – ओझे आहे. दुःख अंतःकरण, नीचस्वभाव

जळफळाट, दुबळेपणा, पळवाट

दंभ – उत्तराधिकार खोटेपणा | सद्गुणी नसताना नाटक

टिळेमाळा, पूजापाठ, यज्ञयाग, तीर्थयात्रा

मिरवूनतेच्या दंभ.

कामक्रोधादिकांचा लोभ नष्ट करण्यासाठी

नरकाच्या ३ दरवाजांचे तीन रिपू

© www.madhaveeraghuveer.com